“मराठवाडा विभागातंर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालयातील माहिती सेवांचा तुलनात्मक अभ्यास ”

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्या शाखेअंतर्गत ग्रंथालय आणि माहितीशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

श्री गजमल अर्जुन बंडू

(M.A., M.Lib. SET)

मार्गदर्शक

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती

(M.Lib. & I.Sc., Ph.D.)

प्राचार्य

कै.सौ. शेषाबाई सिताराम मुंढे कला महाविद्यालय, गंगाखेड

ता. गंगाखेड जि. परभणी

संशोधन केंद्र

माध्यमशास्त्र संकुल,

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

सप्टेंबर २०२१

अनुक्रमणिका
(Index)

अ.क्र.	तपशिल	पृष्ठ क्र.
०१.	प्रस्तावना	०३ - ०४
०२.	विषयाची निवड	०४ - ०५
०३.	व्याख्या	०५ - ०६
०४.	संशोधनाची उद्दिष्टये	०६ - ०७
०५.	संशोधनाची गृहितके	०७
०६.	संशोधनाची व्याप्ती व मर्यादा	०८
०७.	संशोधन पध्दती	०८
०८.	संशोधनाचे तंत्र	०८
०९.	संशोधनाची साधने	०८
१०.	प्रकरणांचा आराखडा	०८-०९
११.	**परिशिष्टे :**	१०

“मराठवाडा विभागातंर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालयातील माहिती सेवांचा तुलनात्मक अभ्यास ”

०१. प्रस्तावना :

महाराष्ट्र हे भारतातील वेगवेगळया क्षेत्रामध्ये प्रगती करणारे व अग्रेसर असणारे राज्य आहे. औद्योगिक क्षेत्राबरोबरच शैक्षणिक दर्जाच्या बाबतीत महाराष्ट्र राज्य हे दूसऱ्या क्रमांकाचे राज्य मानले जाते. प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी, पदव्युत्तर इ. सर्वच क्षेत्रामध्ये महाराष्ट्राने मोठया प्रमाणात यश प्राप्त केले आहे व प्रगती साधली आहे. महाराष्ट्राचे एकूण ५ विभाग आहेत. यात मराठवाडा, खानदेश, पश्चिम महाराष्ट्र, कोकण आणि विदर्भ. या पाच विभागापैकी पश्चिम महाराष्ट्र हे महाराष्ट्रात अग्रेसर असणारा विभाग आहे. या विभागाच्या तुलनेत मराठवाडा विभाग हा कमी प्रगतशील आहे. कारण पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाडा विभाग हा मागसलेला समजला जातो. डोंगराळ भाग, पावसाची अनियमीतता त्याचबरोबर नदयांचे प्रमाण कमी या कारणांमुळे जेवढा विकास व्हायला हवा तेवढया प्रमाणात विकास झाला नाही. परंतु शिक्षणाच्या क्षेत्रात चांगली प्रगती या विभागाची झालेली दिसून येते.

मराठवाडा विभागात आठ जिल्हे असून दोन विद्यापीठे कार्यरत आहेत. यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांचा समावेश होतो. शैक्षणिक विकासात सर्वात महत्वाची भूमिका हे ग्रंथालये बजावताना दिसतात. महाविद्यालयात प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व समाजाला सातत्याने माहिती आणि ज्ञान पुरविण्याचे कार्य ग्रंथालये करतात. प्राथमिक स्तरावर शालेय ग्रंथालये तर उच्च शिक्षणासाठी महाविद्यालये हे महत्वाचे कार्य करतात. महाविद्यालयांचा अत्यंत महत्वाचा केंद्रबिंदू म्हणजे ग्रंथालय होय. ग्रंथालयावरच तेथील प्राध्यापकांचा व विद्यार्थ्यांचा दर्जा अवलंबूल असतो. महाविद्यालयाचे ग्रंथालय जेवढे अद्ययावत असेल तेवढाच शैक्षणिक गुणवत्तेचा विकास अधिक प्रमाणात हे सुत्र विचारात घेता ग्रंथालये ही महत्वाची भूमिका साकारतात. ग्रंथालयात जेवढया अत्याधुनिक सेवा व सुविधा तेवढे ते ग्रंथालय आधुनिक होय.

शैक्षणिक गुणवत्ता हा देशाच्या विकासातील अत्यंत महत्वाचा घटक बनलेलाआहे. त्या दृष्टीकोनातून गुणवत्ता ठरविण्यासाठी नवनवीन कसोटया, मूल्यमापन पध्दतीचा उपयोग सुरु झाला आहे. शैक्षणिक मूल्यमापन करणाऱ्या बहुविध देशातील संस्थामध्ये काही निश्चित समानता आणता येईल या दृष्टीने जागतिक स्तरावर प्रयत्न करण्यात आले व त्या दृष्टीकोनातून दर्जाची समानता व समकक्षता

ठरविण्यासाठी योग्य उपयुक्त ठरलेल्या योजना, पध्दती, संकल्पना, अनुभव, माहिती इ. ची देवाणघेवाण करणे, गुणवत्ता वृध्दींगत करण्यासाठी व वाढवण्यासाठी आणि तीचे मोजमापन करण्यासाठी काही यंत्रणा निर्माण करणे व धोरणात्मक निर्णय घेणे यासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर परिषदेचे आयोजन केले.

आजच्या स्थितीत जागतिक पातळीवर या क्षेत्रात सातत्याने प्रयत्न होत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च शैक्षणिक गुणवत्तेच्या संदर्भात INQAAHE (International Network For Quality Assurance Agencies In Higher Education) ही संस्था आंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत आहे. नॅक (NAAC) ही या संस्थेपैकी एक संस्था आहे. नॅक ही एक स्वायत्त संस्था असून विद्यापीठ अनुदान आयोगाने (University Grant Commission) स्थापना केली आहे. या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्तेची तपासणी व मूल्यमापन करणे होय. या गुणवत्तेमध्ये विविध अभ्यासक्रम, त्या अभ्यासक्रमाची व्याप्ती, वेगवेगळे विषय, भौतिक सुविधा, महाविद्यालयाच्या विकासासाठी प्राध्यापकांचे, ग्रंथपालाचे आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याचे योगदान, संस्थेची आर्थिक स्थिती आणि ग्रंथालय या गोष्टींचा समावेश होतो. नॅम मूल्यांकनात पायाभूत सुविधा, स्थावर मालमत्ता व अध्ययन सामग्री हा घटक महत्वाचा आहे. या घटकात प्रयोगशाळा वर्ग, क्रीडा विभाग, वसतीगृह, संगणक विभाग आणि ग्रंथालय यांचा समावेश होतो.

वरील बाबतीत नॅकच्या दृष्टीकोनातून ग्रंथालय विभागाचा विचार करावयाचा आहे. नॅकच्या संदर्भात मराठवाडयातील दोन विद्यापीठांचा तुलनात्मक दृष्टीकोनातून अभ्यास करण्यात येणार आहे. मराठवाडयातील स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या दोन विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयांचा अभ्यास करताना ग्रंथालय समिती, ग्रंथालय वित्त व्यवस्थापन, संगणकीकरण व सर्वात महत्वाचा घटक म्हणजे ग्रंथालयाव्दारे देण्यात येणाऱ्या माहिती सेवा व सुविधा यांचा विचार करण्यात आला आहे.

०२. विषयाची निवड :

अगोदरच्या काळात वाचकाने ग्रंथ चोरुन नेवू नये यासाठी ग्रंथालयातील पुस्तके ही साखळदंडाने बांधलेली असत. त्याचबरोबर वाचकाने पुस्तके हाताळू नयेत म्हणून कपाटापर्यंत प्रवेश बंद केला होता. साखळीबंद ग्रंथ व प्रवेश बंद काळ, त्याचबरोबर ग्रंथालय म्हणजे ग्रंथाचा प्रचंड मोठा संग्रह व माहितीचा शोध घेण्यासाठी लागणारा कालावधी, त्यासाठी तासन तास प्रयत्न करणारे वाचक आणि वाचकाला सेवा देताना निश्क्रीय राहणारी ग्रंथालये हे सुत्र आता भूतकाळात जमा झाले आहे. आज “माहितीच्या

उगमस्थानापासून तिच्या योग्य व त्या उपभोक्त्यापर्यंतचा तिचा प्रवास लवकरात लवकर सहजरित्या कसा होईल या कार्यात मग्न अशी यंत्रणा म्हणजे ग्रंथालय अशी संकल्पना आता सर्वमान्य झाली आहे.''

म्हणूनच आज केवळ ग्रंथालय सेवा हा शब्द प्रचलित नसून ग्रंथालय आणि माहिती सेवा व आजच्या माहिती आणि संप्रेषणाच्या युगात ज्ञानस्त्रोत केंद्र असा शब्द रुढ झाला आहे. ग्रंथसंग्रहाच्या देवघेवी बरोबरच माहिती सेवा देण्याची भूमिका अभिप्रेत आहे. माहिती सेवा ही आधुनिक काळातील ग्रंथालयाचा आत्मा बनली आहे. माहिती सेवेच्या आधारावरच ग्रंथालयाची आधुनिकता व अद्ययावतता समजली जाते. म्हणूनच संशोधकाने शैक्षणिकदृष्टया गुणवत्ता सुधारण्याच्या दृष्टीनेच स्वा. रा. ती. म. विद्यापीठ, नांदेड व डॉ. बा. आं. म. विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयातील ग्रंथालयाने दिलेल्या माहिती सेवांचा तुलनात्मक अभ्यास करण्यासाठी या विषयाची निवड केली आहे.

मराठवाडयातील नांदेड व औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकनप्राप्त महाविद्यालय ग्रंथालयातून दिल्या जाणाऱ्या माहिती सेवा हया आधुनिक काळाची गरज आहे. ती गरज विचारात घेवूनच या विषयाची निवड केली आहे. ग्रंथालयांचे आजचे बदलते स्वरुप, वाचकांच्या बदलत्या स्वरुपाच्या गरजा आणि मागणी, माहिती तंत्रज्ञानाचा उपयोग, बहुसंज्ञापनाचा उपयोग इ. कारणामुळे ग्रंथालयात वाचकाला माहिती सेवा देणे आवश्यक आहे. वाचकांची असणारी माहितीची गरज पुर्ण झाल्यामुळे त्यांचा विकास होईल. या दृष्टीकोनातून सदर **''मराठवाडा विभागातंर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालयातील माहिती सेवांचा तुलनात्मक अभ्यास ''** विषयाची निवड करण्यात आली आहे.

०३. व्याख्या :

१. नॅक :

नॅक (National Assessment and Accreditation Council) हे राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्विकृती परिषदेचे संक्षिप्त रुप आहे. युजीसी ने नॅक ची स्थापना केली आहे. १६ सप्टेंबर १९९४ रोजी बेंगलोर येथे विद्यापीठ अनुदान आयोग १९५६ च्या कायद्यानुसार ''राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषद'' ची स्थापना करण्यात आली. नॅक ही विद्यापीठ अनुदान आयोगाची स्वायत्त संस्था आहे. देशातील सर्व विद्यापीठ आणि महाविद्यालयांचे त्यांच्या कामगिरीवरुन मूल्यमापन करुन अधिमान्यता देणे हे नॅकचे प्रमुख कार्य आहे.

२. ग्रंथालय :

"ग्रंथालय महणजे सर्वसाधारणपणे सर्व प्रकारची हस्तलिखीत, छापील व डिजीटल स्वरुपातील माहितीसाधने एकत्रितपणे ठेवणे व वाचकांना उपलब्ध करुन देण्याचे स्थान होय."

३. महाविद्यालयीन ग्रंथालय :

"महाविद्यालयातील विद्यार्थी आणि अध्यापक यांना सेवा देण्यासाठी महाविद्यालयाने चालविलेले ग्रंथालय म्हणजे महाविद्यालयीन ग्रंथालय होय."

४. माहिती :

"माहिती म्हणजे कोणत्याही स्वरुपातील, कोणतेही साहित्य असून, त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजनिशी, अहवाल, कागदपत्रे, नमुने, प्रतिमाने, (मॉडेल) कोणतीही इलेक्ट्रॉनिक स्वरुपातील आधार सामग्री होय."

५. माहिती सेवा :

महाविद्यालयातील ग्रंथालय हे सेवेसाठीच आहे. प्रत्येक ग्रंथालयाने सेवा दिलीच पाहिजे. विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक यांना ग्रंथालय साहित्याचा अधिकाअधिक उपयोग करण्याची संधी देणे हे ग्रंथालयाचे मुख्य उद्दिष्ट आहे. ग्रंथालयात देवघेव, वाचन कक्ष, मुक्तव्दार, संदर्भ सेवा व माहिती सेवा इ. सेवा वाचकांना उपलब्ध करुन देणे हे ग्रंथालयाचे मुख्य ध्येय आहे. मुळात ग्रंथालय ही सेवाभावी संस्था आहे. त्याचबरोबर सेवांची व्याप्ती अधिकाधिक वाढत राहणे हे ही आवश्यक आहे. माहिती सेवा ही महत्वाची सेवा आहे. या सेवेसाठी नवीन तंत्रज्ञान अपेक्षीत असते. माहितीची वैशिष्टये, गुणधर्म अचूकता या गोष्टी पाहणे आवश्यक ठरते म्हणून माहिती सेवेसाठी आधारभूत माहिती संचसाठा, माहिती पेढी, व्यवस्थापन, माहितीच्या निरनिराळया प्रणाली, माहिती प्रतीप्राप्तीच्या पध्दती, नवीन तंत्रे व तंत्रज्ञान, संगणकीय संप्रेषण व माहितीची पुर्नप्राप्ती या गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक असते.

०४.संशोधनाची उद्दिष्टये :

संशोधकाने **"मराठवाडा विभागातंर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालयातील माहिती सेवांचा तुलनात्मक अभ्यास "** या विषयावर संशोधन करत असताना पुढीलप्रमाणे उद्दिष्टये निर्धारित केली आहेत.

१. मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयाच्या सद्यस्थितीचा आढावा घेणे.

२. मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत पुरविलेल्या माहिती सेवांचा अभ्यास करणे.

३. मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत संगणकीकरणाव्दारे पुरविल्या जाणाऱ्या सेवांचा शोध घेणे.

४. मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत उपभोक्त्याच्या गुणवत्ता वाढीसाठी चालवण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा आढावा घेणे.

५. ग्रंथालयात माहिती सेवा देत असताना ग्रंथालय कर्मचारी व ग्रंथपाल यांच्या योगदानाचा शोधे घेणे.

वरील उद्दिष्टये संशोधकाने निर्धारित केली आहेत.

०५. संशोधनाची गृहितके :

१. मराठवाडा विभागामधील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत उपभोक्त्यांना आवश्यक असणाऱ्या माहिती सेवा पुरविल्या जातात.

२. प्रचलित जागरुकता सेवा ही कमीत कमी प्रमाणात दोन्ही विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत दिल्या जातात.

३. मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या अधिकाधिक महाविद्यालयीन ग्रंथालयामार्फत सेवा पुरवण्याकरिता संगणकाचा उपयोग केला जात आहे.

४. ग्रंथालयीन सेवा पुरवित असताना ग्रंथपालास प्रशिक्षित कर्मचाऱ्यांचा अभाव जाणवतो.

५. मराठवाडा विभागामधील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या बहुतांश महाविद्यालयीन ग्रंथालयात विविध उपक्रम राबवीले जातात.

०६. संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :

प्रस्तूत संशोधन हे मराठवाडा विभागातील दोन विद्यापीठे नांदेड व औरंगाबाद यांचा समावेश होतो. यात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या नॅक मूल्यांकनप्राप्त पारंपरिक अनुदानित महाविद्यालयापुरते (कला, वाणिज्य व विज्ञान) मर्यादित आहे. या दोन विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात येणार आहे.

०७. संशोधन पध्दती :

प्रस्तूत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग करण्यात येणार आहे. सदरील संशोधनासाठी प्रश्नावलीच्या आधारे माहिती संकलित केली जाणार आहे. संकलीत माहितीचे विश्लेषण, सादरीकरण हे टेबल व आलेख यांच्याव्दारे करण्यात येणार आहे.

०८. संशोधनाचे तंत्र :

सदर संशोधनासाठी पाहणी हे माहिती संकलन तंत्र वापरण्यात येणार आहे.

०९. संशोधनाची साधने :

सदरील संशोधनात माहिती संकलनासाठी ग्रंथपाल प्रश्नावली व मुलाखत या साधनांचा उपयोग केला जाणार आहे.

१०. प्रकरणांचा आराखडा :

प्रस्तूत संशोधन विषयाच्या अनुषंगाने प्रकरणांची विभागणी खालीलप्रमाणे करण्यात आली आहे.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रस्तूत प्रकरणामध्ये प्रस्तावना, समस्या सुत्रण, संशोधन विषय निवडीची कारणे, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची व्याप्ती व मर्यादा, संशोधनासाठी उपयोगात आणली जाणारी संशोधन पध्दती, माहिती संकलन तंत्र, माहिती संकलन साधन, ग्रंथपालन व्यवसायाच्या दृष्टीकोनातून महत्व आणि पुढील प्रकरणाचा संक्षिप्त आढावा यांचा समावेश असणार आहे.

प्रकरण दूसरे : पूर्व साहित्याचा आढावा

सदरील प्रकरणामध्ये प्रस्तूत संशोधनाशी संबंधित पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे. संशोधकाला त्याच्या विषयाची साधर्म्य असलेल्या संशोधकांनी काय शोधून काढलेले आहे. त्यासाठी कोणते निष्कर्ष काढले आहेत या सर्व बाबी जाणून घेणे आवश्यक असते. अशा प्रकारच्या पूर्व साहित्याचा आढावा घेणे म्हणजे संशोधन प्रक्रियेचा एक भागच असतो. या प्रकरणामध्ये पूर्व साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

प्रकरण तिसरे : नॅक व नॅक मूल्यांकन प्राप्त महाविद्यालयातील ग्रंथालयीन सेवा

या प्रकरणामध्ये इंग्रजांचे भारतीय शिक्षणातील योगदान व राष्ट्रीय मूल्यांकन अधिस्विकृती परिषदेचा अभ्यास करत असताना भारतीय शिक्षण आयोग, विद्यापीठ अनुदान आयोग, नॅकची पार्श्वभूमी व स्वरुप, नांदेड व औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयातून वाचकांना सेवा कशा प्रकारे दिल्या जातात याचा अभ्यास केला असून ग्रंथालयाच्या ज्या विविध प्रकारच्या सेवा आहेत उदा. माहिती सेवा, संदर्भ सेवा, आंतरग्रंथालयीन देवघेव, प्रचलित जागरुकता सेवा, भाषांतर सेवा, ग्रंथसूची या पारंपरिक सेवांबरोबरच ग्रंथालयाच्या आधुनिक सेवा आहेत त्यात ओपॅक, इंटरनेट, ई-बुक व ई-जर्नल्स इ. वेगवेगळया सेवांचा परिचय या प्रकरणात देण्यात येणार आहे.

प्रकरण चौथे : माहिती संकलन

या प्रकरणामध्ये उद्दिष्टास अनुसरुन ग्रंथपाल प्रश्नावली व मुलाखती आधारे मराठवाडा विभागातील स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड व डॉ.बा.आं.म. विद्यापीठ, औरंगाबाद या विद्यापीठाशी संलग्नित नॅक मूल्यांकन प्राप्त पारंपरिक अनुदानित (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालय ग्रंथालयांकडून कशी माहिती संकलित करण्यात आली आहे याचे सविस्तर वर्णन करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे : माहितीचे विश्लेषण

या प्रकरणात महाविद्यालयातील नॅक मूल्यांकन करत असताना नॅक मूल्यांकनाच्या पायाभूत सुविधा या चौथ्या कसोटीच्या ग्रंथालयासंदर्भात ग्रंथालय समिती, वित्त व्यवस्थापन, ग्रंथालयाची जागा, ग्रंथालय कर्मचारी, ग्रंथालय व्यवस्थापन, संगणकीकरण व ग्रंथालय सेवा या घटकांच्या आधारे प्रश्नावलीव्दारे संकलीत केलेल्या माहितीचे प्रश्ननिहाय तक्ता आणि आलेख व सांख्यिकीय माहितीच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात येणार आहे.

प्रकरण सहावे : **निष्कर्ष व शिफारशी**

सदरील प्रकरणात प्रश्नावलीच्या माध्यमातून विश्लेषीत माहितीचे प्रश्ननिहाय निष्कर्ष काढण्यात येणार आहेत. त्याचबरोबर शिफारशी, गृहितक पडताळणी व पुढील संशोधनासाठी दिशा देण्यात येणार आहे.

परिशिष्टे :

संदर्भ सूची

ग्रंथपाल प्रश्नावली

नकाशे व छायाचित्रे

प्रस्तावित कार्य योजना

अ.क्र.	कार्याचे स्वरुप	प्रस्तावित कालावधी
१.	संशोधनाशी संबंधित साहित्य संग्रह	६ महिने
२.	मराठवाडा विभागातील नांदेड व औरंगाबाद विद्यापीठाअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालय ग्रंथालयांना भेट देणे व प्रश्नावली तयार करणे	६ महिने
३.	माहिती संकलन आणि प्रश्नावली पाठवणे व मुलाखती	६ महिने
४.	माहितीचे विश्लेषण	६ महिने
५.	प्रबंध लेखन	६ महिने
६.	प्रबंध सादरीकरण	६ महिने

संदर्भ सूची

१. बुआ, जी. ए. (२००७) आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन, नाशिक : साई प्रकाशन.

२. गणपुले, श. रा. (२००५) ग्रंथालय आणि माहितीकेंद्राचे व्यवस्थापन, नाशिक : यचमम‍ु विद्यापीठ.

३. दायमा, ब्रिजमोहन (२००३) नॅकला सामोरे जाताना, लातूर : विद्याभारती प्रकाशन.

४. कदम, रुपाली (मे २००४) विद्यापीठ अनुदान आयोगाचे उच्च शैक्षणिक ग्रंथालयाच्या विकासातील योगदान, नाशिक : यचमम‍ु विद्यापीठ. ज्ञानगंगोत्री.

५. रिसवडकर, म.रा. (२००२) ग्रंथालय आणि माहितीशास्त्राची संशोधन पध्दती, नाशिक : यचमम‍ु विद्यापीठ.

६. निकोसे, सत्यप्रकाश (२००७) आधुनिक ग्रंथालयाचे व्यवस्थापन, नागपूर : प्रज्ञा प्रकाशन.

७. जमधाडे, पी. यु. (२००६) ग्रंथालय प्रकार, परिचय आणि कार्य, परभणी : मराठवाडा ग्रंथालय संघाचे ग्रंथपरिवार प्रकाशन.

८. कापडे, दिपक (२००९) माहिती सेवा आणि साधने, नागपूर : रजनी प्रकाशन.

९. वीर, डी. के. (२००१) ग्रंथालय संघटन,मराठवाडा विभाग ग्रंथालय संघ.

१०. काचोळे, दा. धो. (२००५) सामाजिक संशोधन पध्दती, औरंगाबाद : कैलास पब्लिकेशन.

११. www.srtmun.ac.in

१२. www.bamua.digitaluniversity.ac

१३. www.wikipedia.org

१४. www.naac.gov.in

संशोधक

गजमल अर्जुन बंडू

मार्गदर्शक

डॉ. ढाकणे बालाजी निवृत्ती
प्राचार्य
कै.सौ. शेषाबाई सिताराम मुंढे कला
महाविद्यालय, गंगाखेड जि. परभणी